New Vision

ISSN No. 2394-9996

# New Vision

## Multi-disciplinary Research Journal

July 2015

Online version : http://www.milliyaresearchportal.com

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned by CamScanner

| Sr. No. | Paper Name | Name | Subject | Page No. |
|---|---|---|---|---|
| (21) | Comparison of Self-Concept on Different Levels of Participation in football Players | Mr. Parvez Khan<br>Dr. Sk Ataullah Jagirdar | Physical Education | 92 |
| (22) | Comparative Study of Health Related Physical Fitness Among girls of Maharashtra | Dr. Saudagar Faruk Gafur<br>Dr. Sk Ataullah Jagirdar | Physical Education | 97 |
| (23) | Relationship between playing ability of Handball Players and Motor fitness Components. | Mr. Sayyad Shanoor Noor. | Physical Education | 103 |
| (24) | दौलताबाद किल्ल्याचे महत्व | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | History | 109 |
| (25) | 1857 च्या राष्ट्रीय उठावात मौलवी अहमद उल्ला शाहचे योगदान | प्रा. शेख हुसैन इमाम | History | 111 |
| (26) | मानवी जीवनात आहार आणि खेळाचे महत्व | प्रा. जाधव एस.बी. | Home Science | 114 |
| (27) | Maharashtra ke Qadeem Deeni Idare | Dr. Abdus Shukoor Quasmi | Arabic | 116 |
| (28) | "Nazr-e- Butan" Ek Mutale'a | Prof. Syed Fareed Ahmed Nahri | Urdu | 120 |
| (29) | Jamiya Osmaniya Aur Urdu Taleem | Dr. Syed Asfiya Madni | Urdu | 125 |
| (30) | Urdu Gazal Mein Hindustani Tahezibi wo Ma'ashrti Pas Manzar | Dr. Maqbool Saleem Shaikh Mahtab | Urdu | 129 |




Scanned by CamScanner

ISSN No. 2394-9996

# दौलताबाद किल्ल्याचे महत्त्व

**प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन**
इतिहास विभाग प्रमुख,
मिल्लिया कला व विज्ञान महाविद्यालय, बीड.

भारताच्या इतिहासात दौलताबादच्या किल्ल्याचा समावेश एक मजबूत किल्ला म्हणून होतो. तो किल्ला फक्त तोफेचा वापर करून जिंकला जाऊ शकत नव्हता. मध्य काळात या प्रदेशावर सत्ता प्रस्थापित करावयाची असेल तर त्या प्रदेशातला किल्ला जिंकणे आवश्यक होते. दौलताबादचा किल्ला मध्यकाळात काही काळ सत्तेचा केंद्रबिंदु होता. एवढेच नसुन संस्कृती ज्ञान व अनेक कलांचा ही केंद्र होता. असे अनेक इतिहासकारांनी वर्णन केलेले आहे. हा अतीभव्य किल्ला औरंगाबादच्या उत्तर पश्चिमीच्या दिशेला औरंगाबाद पासून 13 किलो मीटर अंतरावर आहे. हा किल्ला बांधकाम कला, आकर्षक, नक्शी काम, व कोरवलेले दगडी कामाचा न्हदय स्पर्श एकमेव नमूना आहे.

दौलताबादच्या किल्ल्याचे जुने नाव देवगीरी होते. हा किल्ला यादव घराण्यातील राजा भल्लम पाचवा याने 1187 मध्ये बांधला. 1 हा किल्ला एक उंच पर्वताला कोरून बांधलेला आहे. तेथे राजा भल्लमने मंदिर ही बांधले. राजा भल्लम पाचवाने देवगीरीला आपली राजधानी स्थापन केली. 2 देवगिरी फारच लवकर राजकारण, उद्योग, व्यापराचे कला व ज्ञानाचे केंद्र बनले.

देवगिरीच्या संपत्तीची माहिती ऐकून 1294 मध्ये अलाऊद्दीन खिलजीने या वर हल्ला केला व देवगिरीचा राजा राम चंद्र देव चा पराभव केला. परत जातांना त्याने सोन्या चांदीच्या मोहरा, हिरे, मोती, हत्ती, घोडे व पंचंड संपत्ती आपल्या बरोबर नेली. ज्याचे चांगले वर्णन तारीख ए. फेरिश्ता या ग्रंथात केले आहे. राजा राम देवच्या निधनानंतर 1307 मध्ये अलाऊद्दीनने देवगीरीला आपल्या साम्राज्यात विलीन केले. 3 अलाऊद्दीनच्या निधनानंतर त्याचा मुलगा कुतूबोद्दीन मुबारक शाह हा दिल्लीच्या गादीवर आला. 1318 मध्ये देवगीरी येथे हरपालदेव् याने बंडाचा झेंडा उभारला. हे बंड मोडून काढण्यासाठी मुबारक खिलजी स्वत: देवगीरीला आला व हरपालदेवचे बंड मोडून काढले.

प्रसिध्द उर्दू व हिंदी कवी हजरत अमीर खुसरौ यांनी दौलताबादच्या किल्ल्याची प्रशंसा केलेली आहे. त्यांनी म्हटले होते की, ``देवगीरी किल्ल्याच्या भींती एवढ्या गुळगुळीत होत्या की तयावरून एक मुंगी ही वर चढू शकत नव्हती.`` 4

खिलजी घराण्याच्या अस्ता नंतर तुघलक घराण्याचा उदय झाला. या घराण्याचा मोहम्मद तुघलक हा 1325 मध्ये दिल्लीच्या गादीवर बसला. मोहम्मद तुघलक हा फार बुध्दिमान व शुर सुलतान हेता. याने देवगीरीला आपली राजधानी बनविण्याचे ठरविले. 1327 मध्ये तो देवगीरीत दाखल झाला. त्याने देवगीरीला दौलताबाद असे नाव दिले. मोहम्मद तुघलख याने देवगीरीच्या किल्ल्यात मोठ मोठे महाल, मस्जिद, स्नान गृहे किल्ल्याची तटबंदी बांधली, किल्ल्यातील खूल्या जागेत बगीचे लावले. प्रसिध्द इतिहास कार व प्रवासी (पर्यटक) इब्न-ए-बतूता आपल्या प्रवास वर्णनात रहला मध्ये दालताबादच्या किल्ल्याची माहिती दिलेली आहे. तो म्हणतो देवगीरी ज्याला आज आपण दौलताबाद म्हणतो हे एक फार मोठे शहर आहे हे शहर आपल्या महत्त्वासाठी, बांधकामासाठी, विस्तारसाठी , दिल्ली सारखे आहे. देवगीरीचा किल्ला पर्वताला चारही दिशांनी कोरून किंवा कट करून पर्वतच्या शेवटच्या भागावर बनविण्यात आला आहे. 5 मोहम्मद तुघलकच्या



Scanned by CamScanner

काळातील प्रसिध्द इतिहासकार अब्दूल मलीक असामी आपली पुस्तक फुतूह-उल-सलातीन मध्ये किल्ल्याच्या महत्वासंबंधी लिहितो. ``किल्ला देवगीरी असा आहे की, पर्वताला चारही दिशांनी छाटून बनविण्यात आला आहे. किल्ल्यात प्रवेश करण्याचा मार्ग कोणालाच सापडत नाही. तीनही दिशेला पाण्याने भरलेली खंदक खोदलेली आहे.``

1341 मध्ये मोहम्मद तुघलखने आपली राजधानी दौलताबादहून पुन्हा दिल्लीला हलवली. 1347 मध्ये अलाउद्दीन हसन बहुमनी याने दौलताबादच्या किल्ल्यात आपल्या स्वतःच्या राज्याच्या स्थापनेची घोषणा केली. सुलतान अलाऊद्दीन हसन बहमनी याने दौलताबादचे नाव बदलून फतेहबाद ठेवले. पण हे नाव अधिक प्रसिध्द झाले नाही. आज हा किल्ला दौलताबाद या नावाने प्रसिध्द आहे.

शाहजहाँनच्या काळातील इतिहासकार अब्दूल हमीद लाहोरी ने आपली पुस्तक बादशाह नामा मध्ये लिहिले आहे की, हा किल्ला ज्याचे जूने नाव देवगीरी आणि धरागिर होते. आज दोलताबादच्या नावाने ओळखले जाते. हा किल्ला एका मोठ्या पर्वतावर आहे.

16 व्या शतकाच्या सुरूवातीला बहमनी राज्याचे पाच शाहया मध्ये विभाजन झाले. दौलताबादचा किल्ला अहमद नगरच्या निझाम शाहीत राज्याचा एक भाग बनला. मलिक अंबर हा अहमद नगरच्या निझामशहीचा मूख्य वजीर होता. शेवटपर्यंत त्याने मोगल फौजेशी टक्कर दिली. 1600 मध्ये अकबर ने अहमद नगरचा किल्ला जिंकल्यानंतर मलिक अंबर याने मूर्तूझा निझाम शाहला दोलताबादच्या किल्ल्यात आणले होते. मलिक अंबरच्या निधनानंतर त्याचा मुलगा अझीझ-उल-मुल्क उर्फ फतेहखानला निझामशहाने वजीर म्हणून नियुक्त केले. तो आपल्या बापा प्रमाणे प्रामाणीक नव्हता. त्याने एका षडयंत्राद्वारे निझामशहाला आणि दौलताबादचा किल्ला मोगल अधिकारी महाबत खानच्या स्वाधीन केला. या प्रकारे अहमद नगर ची निझामशाही नष्ट झाली.

कुतूबशाही घराण्याचा शेवटचा राजा अबूल हसन ताना शाह याला औरंगजेबाने दौलताबाद च्या किल्ल्यात कैद केले होते. मोगल सत्तेच्या अस्तानंतर 1948 पर्यंत हा किल्ला हैदराबादच्या निझामाच्या ताब्यात होता. हा किल्ला जिंकण्यासाठी अवघड असल्यामुळे देश स्वतंत्र होई पर्यंत या किल्ल्याचे महत्व होते.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


(1) तारीख के झरोके से लेखक - डॉ. मिर्झा मोहम्मद खिजर बेग पान नं. 13 - प्रकाशक अखतर पब्लिकेशन्स, अख्तर कदा, हिमायत बाग, औरंगाबाद.

(2) दिल्ली सल्तनतचा इतिहास, लेखक, प्राचार्य, डॉ. एस.एस. गाठाळ, पान नं. 87 प्रकाशक कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद.

(3) तारीख के झरोके से लेखक - डॉ. मिर्झा मोहम्मद खिजर बेग पान नं. 14 - प्रकाशक अखतर पब्लिकेशन्स, अख्तर कदा, हिमायत बाग, औरंगाबाद.

(4) तारीख के झरोके से लेखक - डॉ. मिर्झा मोहम्मद खिजर बेग पान नं. 16 - प्रकाशक अखतर पब्लिकेशन्स, अख्तर कदा, हिमायत बाग, औरंगाबाद.

(5) तारीख के झरोके से लेखक - डॉ. मिर्झा मोहम्मद खिजर बेग पान नं. 16 - प्रकाशक अखतर पब्लिकेशन्स, अख्तर कदा, हिमायत बाग, औरंगाबाद.

(6) तारीख-ए-फेरिश्ता, लेखक - मोहम्मद कासीम फेरिश्ता प्रकाशक - अय्यूब पब्लिकेशन्स देवबंद यू.पी.

(7) मोगल कालीन भारताचा इतिहास लेखक - डॉ. एस.एस. गाठाळ प्रकाशक कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद.


Scanned by CamScanner



जल है तो कल है।
आज तो यह हाल है।



पाणी का मोल पहचानीए।

**Save Water Save Life**

Scanned by CamScanner